## मुख्य कार्यालय, विरार
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.१७/०९/२०२६

***मा.महापौर महोदयांच्या हस्ते "सेवा संकल्प अभियान" उपक्रमाचे उद्घाटन संपन्न ;***
***दि.१७ सप्टेंबर ते दि.१७ ऑक्टोंबर, २०२६ या कालावधीत महानगरपालिकेत राबविणार "सेवा संकल्प अभियान"***

माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदीजी यांच्या संविधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त त्यांच्या सेवा कार्याचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने त्यांच्या वाढदिवसानिमित्त दि.१७ सप्टेंबर, २०२६ ते दि. १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत राज्यात "सेवा संकल्प अभियान" राबविण्याबाबत शासन निर्देश प्राप्त झाले आहे. त्याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत दि.१७ सप्टेंबर, २०२६ ते दि.१७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत "सेवा संकल्प अभियान" राबविण्यात येणार आहे. या कालावधीत महानगरपालिकेमार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या "सेवा संकल्प अभियाना" अंतर्गत महानगरपालिकेमार्फत विविध लोकोपयोगी उपक्रमांद्वारे जास्तीत जास्त लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.
कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यानंतर मा.महापौर महोदयांच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे यांनी केले, त्यांनी दि.१७ सप्टेंबर, २०२६ ते दि.१७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत "सेवा संकल्प अभियान" अंतर्गत महानगरपालिकेद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. या कालावधीत महानगरपालिकेमार्फत विविध ठिकाणी मालमत्ता कर आकारणी शिबिरे, नवीन नळ जोडणी शिबिरे, रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे इ.विविध शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. मालमत्ता हस्तांतरण नोंद घेणे, मालमत्ता कराची आकारणी करणे व मागणी पत्र देणे, नव्याने नळ जोडणी देणे, जन्म मृत्यू नोंद घेणे व प्रमाणपत्र देणे, विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे, महानगरपालिका कार्यक्षेत्रात नव्याने जास्तीतजास्त व योग्य प्रकारे बचत गटाची स्थापना करणे, रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर, महिलांचे आरोग्य व स्वच्छता, अवयवदान संकल्प अभियान, दिव्यांग लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देणे, ठिकठिकाणी वृक्षारोपण अभियान राबविणे, तसेच स्वच्छता ही सेवा अंतर्गत स्वच्छता अभियान राबविणे, प्लास्टिक मुक्ती जागरुकता, कचरा वर्गीकरण आणि कंपोस्टिंग, योग आणि ध्यान सत्र, फिट इंडिया खेळ सत्र, पोषण आणि ॲनिमिया जागरुकता असे विविध उपक्रम महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमांतर्गत विविध आयोजित शिबिरांची माहिती महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येणार असून नागरिकांनीही या विविध सेवांचा लाभ घेण्यासाठी महानगरपालिकेच्या विभागांशी संपर्क साधावा व योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन मा.अतिरिक्त आयुक्तांनी यावेळी केले.

कार्यक्रमात प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते कर आकारणी दाखला, थकबाकी नसलेबाबतचा दाखला, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, मृत्यू प्रमाणपत्र अशा विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. तसेच ज्येष्ठ नागरिकांना डायलेसीस उपचाराकरिता धनादेशाचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे यावेळी पदोन्नती मिळालेल्या मनपा कर्मचाऱ्यांना पदोन्नती प्रमाणपत्राचे वाटपही करण्यात आले. यावेळी दि.२९ सप्टेंबर

२०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार महाकुंभ रोजगार मेळाव्यात गरजू नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहनही करण्यात आले. सदर रोजगार मेळावा महानगरपालिका क्षेत्रातील न्यू विवा कॉलेज विरार (प), प्रगती पदवी कॉलेज वसई, युनिव्हर्सल स्किलटेक युनिव्हर्सिटी वसई, गोवालीस इंडस्ट्रीज असोसिएशन वसई या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे.

यावेळी मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.) यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले कि, या अभियानांतर्गत महानगरपालिकेमार्फत नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध सेवा जलदगतीने कशाप्रकारे देता येतील त्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. नागरिकांशी संबंधित प्रलंबित विषय तसेच अंतर्गत कार्यालयीन प्रलंबित प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढणे, तसेच सध्या देण्यात येणार सेवा आणखी जलदगतीने नागरिकांना कशाप्रकारे देता येतील यासाठीही प्रशासनामार्फत विभागनिहाय माहिती घेऊन विशेष प्रयत्न केला जाणार असल्याचे मा.आयुक्त महोदयांनी सांगितले. तसेच या उपक्रमाद्वारे नागरिकांच्या मनात महानगरपालिका प्रशासनाविषयी अधिक विश्वासाहर्ता निर्माण करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न करावेत, नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या दूर करण्यासाठी विविध ठिकाणी भेटी द्याव्यात, प्रभागातील लोकप्रतिनिधींशी संवाद साधून विविध स्थानिक प्रश्न दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत व नागरिकांना योग्य त्या सेवा सुविधा द्याव्यात असे मा.आयुक्त महोदयांनी यावेळी सांगितले.

मा.महापौर श्री.अजीव पाटील महोदयांनी यावेळी संबोधताना माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदीजी यांच्या संविधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त त्यांच्या सेवा कार्याचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने "सेवा संकल्प अभियान" महानगरपालिकेत राबविण्यात येत असून महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांचा लाभ अधिकाधिक नागरिकांना मिळावा यासाठी महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करणार आहेत व यासाठी अधिकारी व कर्मचारी यांना मा.महापौर यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच मा.पंतप्रधान महोदयांच्या पुढील आयुष्यासाठी तसेच देशाच्या भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमावेळी मा.महापौर श्री.अजीव पाटील, मा.उप-महापौर श्री.मार्शल लोपीस, मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.), मा.सभागृह नेते श्री.प्रफुल्ल साने, अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे व श्री.दिपक सावंत, सन्माननीय नगरसेवक-नगरसेविका, लाभार्थी नागरिक, पत्रकार, महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरसचिव श्री.विश्वनाथ तळेकर तर आभार प्रदर्शन परिवहन व्यवस्थापक श्री.धैर्यशील जाधव यांनी केले.